# आम आदमी विमा योजना

ग्रामीण भागातील १८ ते ५९ वयोगटातील भूमिहीन शेतमजुरांना या योजनेअंतर्गत लाभ देण्यात येतो. वार्षिक विम्याचा हप्ता प्रति लाभार्थी रु. २००/- इतका असून केंद्र शासनामार्फत रु. १००/- व राज्य शासनामार्फत रु. १००/- इतका विम्याचा हप्ता भारतीय आयुर्विमा महामंडळाला देण्यात येतो. लाभार्थ्यांचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या वारसाला रु. ३०,०००/- इतकी रक्कम देण्यात येते. त्याचप्रमाणे खालीलप्रमाणे घटना घडल्यास लाभार्थ्यांच्या वारसास/लाभार्थ्यांस रक्कम देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| १) अपघाती मृत्यू | - | रु. ७५,०००/- |
| २) अपघातामुळे कायमचे अपंगत्व | - | रु. ७५,०००/- |
| ३) अपघातामुळे दोन्ही डोळे वा दोन्ही पाय गमावल्यास | - | रु. ७५,०००/- |
| ४) अपघातामुळे एक डोळा वा एक पाय गमावल्यास | - | रु. ३७,५००/- |

त्याचप्रमाणे लाभार्थ्यांच्या नववी ते बारावी इयत्तेत शिकणाऱ्या दोन मुलांना रु. १००/- प्रतिमहा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते.

ज्या व्यक्तिकडे २.५ एकर बागायती किंवा ५ एकर कोरडवाहू जमीन असेल, अशा व्यक्तिला या योजने अंतर्गत भूमिहीन समजण्यात येते.

महा सेवा केंद्र

Maha Online limited